**महाराष्ट्र शासन**

**सार्वजनिक बांधकाम विभाग,**

परिपत्रक क्रमांक- आरबीडी-१०९६/(१८८०)/ रस्ते-७,

मंत्रालय मुंबई-४०० ०३२

दिनांक- १/८/१९९७.

शासनस्तरावरून द्रुतमार्गासबंधी पथकिनारवर्ती नियमाबाबत क्रमांक-आरबीडी १०९६/ (१८८०)/रस्ते७ दिनांक-२३/५/९७ नुसार परिपत्रक निर्गमित करण्यात आलेले आहे. ते परिपत्रक रद्द करण्यात येत असुन सुधारित परिपत्रक पुढीलप्रमाणे निर्गमित करण्यात येत आहे.

२. महाराष्ट्र शासनाने द्रुतमार्गाचे काम हाती घेण्याचे ठरविले आहे. द्रुतमार्गाच्या जमिनीच्या हद्दीवर कुंपण असते व कोणताही जोडरस्ता द्रुतमार्गास अनुज्ञेय नसतो. द्रुतमार्गाची संकल्पना ही देशात नवीन असल्याने त्यासाठी पथकिनारवर्ती बांधकाम नियम (रिबन डेव्हलपमेंट रूल्स) अस्तित्वात नाहीत. म्हणुन वर दिलेली द्रुतमार्गाची वैशिष्टे लक्षात घेऊन त्यासाठी नियम तयार करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

३. शासन आता असे आदेश देत आहे की;द्रुतमार्गाची इमारत रेषा (बिल्डींग लाईन) ही रस्त्याच्या मध्यापासून ६० मीटर किंवा द्रुतमार्गासाठी घेण्यात आलेल्या जागेच्या हद्दीपासून १५ मीटर अंतरापर्यंत या दोहोपैकी जास्त असेल त्या अंतरावर असावी. द्रुतमार्गासाठी इमारत रेषा व नियत्रंण रेषा एकच असेल. रस्त्याची हद्द व इमारत रेषा / नियत्रंण रेषा यामधील जागेमध्ये कुंपणाशिवाय कोणत्याही प्रकारचे बांधकाम करता येणार नाही.सदर तरतुदी मुंबई महामार्ग अधिनियम १९५५ मधील कलम-७ अतंर्गत करण्यात येत आहेत.

४. द्रुतमार्गाची आखणी निश्चित झाल्यावर सबंधित महामार्ग प्राधिकारणाने (हायवे अथॉरिटीने)मुंबई महामार्ग अधिनियम १९५५ (बॉम्बे हायवे अक्ट १९५५) कलम-७ मधील तरतुदीनुसार गॅझेट नोटिफिकेशन काढावे व त्यात वरीलप्रमाणे इमारत रेषा व नियत्रंण रेषाबाबत तरतुदी विहीत कराव्यात.

**महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने,**

**( ज. त्रिं. नाशिककर)**

**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत-**